अर्ज औ.वि.का. क्रं.५/२०२५
निशाणी यु—६

| | | |
|---|---|---|
| नाव | :— | एजाज अहेमद शेख चांद |
| वय | :— | ६० वर्षे |
| व्यवसाय | :— | सेवानिवृत्त |
| राहणार | :— | बुलडाणा |

**<u>सरतपासणी विधिज्ञ श्री. जी. आर. गावंडे, अर्जदारांकरीता</u>**

**१)** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रं. यु—६ खाली माझे शपथपत्र दाखल असून त्यातील लिहीलेला सर्व मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा आहे आणि तो मला माझ्या विधिज्ञांनी समजून सांगितलेला आहे, आणि त्यावर मी सही केलेली आहे. मी या प्रकरणात नि. क्र. यु—२ खाली कागदपत्रांची यादी दाखल केलेली असुन त्याचे विवरण येणेप्रमाणे :

१. निशाणी यु—७ खाली विभागीय आस्थापना आदेश क्र. ५७/२०२५
२. निशाणी यु—८ खाली दि. २७/१/२०२५ रोजी अर्जदारांनी प्रतिवादींना मागणी केलेले पत्र
३. निशाणी यु—९ खाली दि. ५/२/२०२५ रोजी अर्जदारांनी मागणी केलेले पत्र
४. निशाणी यु—१० खाली दि. ८/७/२०२५ रोजी अर्जदारांनी मुळ वेतन वाढल्यामुळे वेतनातील फरक मिळण्याकरीता पाठविलेले पत्र

**सरतपासणी पुर्ण.**

**<u>उलटतपासणी प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री आर. एम. काशीकर</u>**

**२)** हे म्हणणे खरे आहे की, मी महामंडळात लिपीक म्हणुन नोकरीस लागलो. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठ लिपीक म्हणुन माझी पदोन्नती सन २०११ मध्ये झाली. सन २०१८ मध्ये माझी पदोन्नती आस्थापना पर्यवेक्षक म्हणुन झाली आणि दि. ३१/१२/२०२२ रोजी मी

**अर्ज औ.वि.का. क्र.५/२०२५**
**निशाणी यु—६**

सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की, आस्थापना पर्यवेक्षक म्हणुन काम केलेले असल्यमुळे महामंडळाचे कर्मचा—यांचे उपदान रजेचे वेतन काढण्यासंदर्भात नियम मला माहिती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, उपदान रक्कम निश्चित करण्याकरीता आणि रजा रोखीकरण रक्कम निश्चित करण्याकरीता वेगवेगळे नियम आहेत. शपथपत्रामध्ये परिच्छेद ०२ मध्ये मी जे सुत्र दाखविलेले आहे त्याचा निश्चित उगम मला सांगता येणार नाही. रजा रोखीकरण करण्याकरीता जास्तीत जास्त ३०० दिवस रजेचे रोखीकरण केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, रजा रोखीकरणाचे सुत्र मुळ वेतन अधिक महागाई भत्ता भागिले ३० गुणीले रजेचे दिवस, असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे सुत्र पुर्ण महाराष्ट्भर महामंडळाला लागु होते. हे म्हणणे खरे नाही की, मला महामंडळाने त्यांच्या सुत्रानुसार रजा रोखीकरण रक्कम रु. ६,८१,९३४/— ही दिलेली परिपुर्ण, योग्य व कायदेशीर आहे. ही रक्कम मला मिळाली पण ती परिपुर्ण नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींकडे जी रजा रोखीकरणाची रक्कम मागितलेली आहे ती पुर्णपणे चुकीने आणि मनमानी पध्दतीने मागितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नियमीत कर्मचा—यांना देखील रजा रोखीकरणाचे सुत्र मुळ वेतन अधिक महागाई भत्ता भागिले ३० गुणीले रजेचे दिवस, असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रस्तुतचा अर्ज खोटा व बेकायदेशीर असुन माझे शपथपत्र देखील खोटे व चुकीचे आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**

**सरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

स्वा/—
(शा. श. जहागिरदार)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, बुलढाणा.

ठिकाण :— बुलढाणा.
दि. :— १६/१२/२०२५